**नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग निर्मिती व तद्नुषंगिक कामासाठी लॅण्ड पुलिंग योजनेद्वारे जमीन प्राप्त करणे व विकसित जमिनीच्या स्वरुपात मोबदला प्रदान करणे व तद्नुषंगिक बाबींस मान्यता देण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: खाक्षेस २०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ जुलै, २०१६

प्रस्तावना :-

मुंबई ही देशाची आर्थिक व वाणिज्यिक राजधानी आहे. या महानगरातून जगातील व देशातील जवळपास सर्व मोठ्या शहराशी हवाई मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. मुंबई पोर्ट ट्रस्ट, जे.एन.पी.टी., कोकण किनारपट्टीवरील धरमतर, दिघी बंदर व जयगड बंदर या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात जलवाहतूक होते. या महानगरातून प्रमुख राष्ट्रीय महामार्गाद्वारे देशांतर्गत मोठ्या प्रमाणात भूपृष्ठ वाहतूक होते. मुंबई महानगर प्रदेशामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक होत आहे. नागपूर ही राज्याची उपराजधानी असून, देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. नागपूर, वर्धा, अमरावती, जालना, औरंगाबाद, नाशिक या शहरांमध्ये व लगतच्या परीसरामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना कार्यरत आहेत. राज्यातील औद्योगिक व वाणिज्यिक गुंतवणूक मुंबई महानगरासह राज्यामध्ये समतोल स्वरुपात होण्याच्या दृष्टीने, कृषी व कृषी पूरक उद्योगास चालना देण्याच्या दृष्टीने, ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचा दर उंचाविण्यासाठी भूपृष्ठ वाहतुकीच्या उपलब्ध मार्गाच्या सेवा क्षमतेमध्ये लक्षणीय वाढ करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्राची उपराजधानी असलेले नागपूर हे शहरही औद्योगिकदृष्टया मोठी गुंतवणूक झालेले औद्योगिक केंद्र म्हणून विकसित झाले आहे. या दोन महत्वाच्या शहरांना शिघ्रसंचार द्रुतगती मार्गाने जोडल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्याचा संतुलित व समतोल विकास होण्याचे स्वप्न साकार होणार आहे. त्यानुषंगाने शासनाने नागपूर व मुंबई महानगरादरम्यान भूपृष्ठ वाहतूक सुलभ होण्याच्या दृष्टीने नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने या द्रुतगती मार्गाची ग्रीन फिल्ड अलाईनमेंट (Green Field Alignment) करण्यास आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांना या प्रकल्पासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यास मान्यता दिलेली आहे. या द्रुतगती मार्गाच्या विकास व बांधणी करीता Annuity व Land Pooling Model चा अवलंब करण्याच्या सूचना केल्या.

२. शासनाने या द्रुतगती मार्गाची आखणी प्रामुख्याने मनुष्यवस्ती नसलेले, शक्यतो बागायती जमीन नसलेले, कोणतेही विकास न झालेले भूभाग, तसेच मोठी धरणे, जलाशये, वनजमिनी, पर्यावरण संवेदनक्षम क्षेत्रे, वन्यजीव क्षेत्रे / अभयारण्ये यातील जमिनी वगळून करण्याचे संकल्पित केले आहे. तसेच या मार्गाच्या आखणीवर साधारणतः २५ ते ४० कि.मी. अंतरावर विशेषतः ज्या ठिकाणी आजूबाजूचे जिल्हा, तालुका मुख्यालये व मोठी क्षेत्रे जोडण्यासाठीचे जोडरस्ते मिळून छेदमार्ग (Interchanges) तयार होणार आहेत, त्या ठिकाणी सर्व पायाभूत सुविधांसह साधारणतः २४ नवनगरे (New Townships) निर्माण करण्याचे योजिले आहे. जेणेकरून या नवनगरातील

अभिन्यासामध्ये द्रुतगती मार्ग, जोडरस्ते व नवनगरांसाठी आवश्यक जमीन भागीदारी तत्वावर देऊ करणाऱ्या भूधारकांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात त्यांना विकसित बिनशेती भूखंड मोबदला म्हणून दिले जाऊ शकतील.

३. केंद्र शासनाचा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ हा दिनांक १ जानेवारी, २०१४ पासून अंमलात आला आहे. या अधिनियमाचे कलम १०८ मधील तरतुदीनुसार, संपादित करावयाच्या जमिनीची नुकसान भरपाई व पुनर्वसनाचे लाभ, भूमिसंपादन अधिनियम, २०१३ नुसार देय होणाऱ्या नुकसान भरपाई व लाभांपेक्षा, राज्य शासनाच्या कायद्यान्वये / धोरणान्वये निश्चित केलेली नुकसान भरपाई व इतर लाभ भूधारकांना एकंदरीत जास्त फायदेशीर होत असतील व संबंधित व्यक्तीची सदर नुकसान भरपाई व लाभ स्विकारण्यास संमती असेल, तर अशी जास्त लाभदायक नुकसान भरपाई आणि पुनर्वसनाचे लाभ संबंधित भूधारकांना स्विकारण्यास मुभा आहे, अन्यथा त्यांना भूमिसंपादन अधिनियम, २०१३ नुसार नुकसान भरपाई देय ठरते. या केंद्रीय कायद्याच्या कलम १०८ ची तरतूद पाहता, राज्य शासनाच्या कायद्याप्रमाणे किंवा धोरणाप्रमाणे सदर नवीन केंद्रीय कायद्यात प्रस्तावित केलेल्या जमीन संपादनाच्या मोबदल्यापेक्षा जास्त मोबदला तसेच पुनर्वसनाच्या तरतुदीपेक्षा एकंदरीत जास्त लाभ देय असतील तर भूधारकांची किंवा बाधित व्यक्तींची संमती असल्यास असा जास्त मोबदला आणि पुनर्वसनाच्या जास्त लाभदायक तरतुदी लागू करता येतील.

४. या पार्श्वभूमीवर नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग, जोडरस्ते व त्यावरील नवनगरांच्या आखणीमध्ये अंतर्भूत जमिनी भूधारकांकडून स्वेच्छेने, संमतीने, विना संघर्ष व सत्वर प्राप्त होण्यासाठी, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व आंध्र प्रदेशाच्या अमरावती या नूतन राजधानी क्षेत्राच्या लॅण्ड पुलिंग योजनेंतर्गत देय व अनुज्ञेय लाभ विचारात घेऊन, नवीन केंद्रीय भूमिसंपादन कायद्यापेक्षा जास्त मोबदला व अधिक लाभदायक योजना लागू करण्याविषयी धोरण ठरविणे व यानुषंगाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाइ मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १०८ मधील तरतूद विचारात घेऊन, भूधारकांना द्यावयाच्या देय मोबदल्यासंबंधीची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या सर्व बाबींचा साकल्याने सखोल विचार विनिमय करुन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग, जोडरस्ते व त्यावरील नवनगरे यांचे आखणीमध्ये अंतर्भूत जमिनी भूधारकांकडून स्वेच्छेने, संमतीने, विना संघर्ष व सत्वर प्राप्त होण्यासाठी, अशा भूधारकांसाठी त्यापोटी देय मोबदल्याबाबत आणि त्यानुषंगिक लाभांसंदर्भात खालील नमूद बाबींना शासन मान्यता देण्यात येत आहे :-

१. **विकसित बिनशेती भूखंडाच्या स्वरुपात परतावा:-**

१.१ भूमिसंपादन अधिनियम २०१३ नुसार जाहीर करण्यात येणाऱ्या निवाड्याप्रमाणे अंतिमत: सर्व घटकांसह देय होणारा परतावा, रोख रकमेऐवजी, भूधारकांना प्रती १०,००० चौ.मी. करीता नियोजित नवनगरामध्ये एक (१) अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकासहित खालीलप्रमाणे विकसित बिनशेती जमीन / भूखंड अनुज्ञेय व देय राहील.

| अ.क्र. | जमिनीचा तपशील | भूधारकांना परत द्यावयाच्या निव्वळ विकासयोग्य क्षेत्र (टक्केवारी) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | द्रुतगती मार्ग व जोडरस्ते यांचे आखणीमध्ये समाविष्ट जमिनी | |
| अ | जिरायत जमिन | २५% |
| ब | बागायत जमिन | ३०% |
| २ | नवनगरांच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनी | ३०% |

(उदा. जसे की प्रति १०,००० चौ.मी क्षेत्राकरिता २५% प्रमाणे २५०० चौ.मी आणि ३०% प्रमाणे ३००० चौ.मी निव्वळ विकासयोग्य क्षेत्र अनुज्ञेय राहील.)

१.२ शासनाच्या विविध कायद्याखाली धारण / प्रदान / पुनर्प्रदान केलेल्या जमिनीबाबतच्या भूधारणा पद्धती विचारात घेऊन उपरोक्त परिच्छेद १.१ प्रमाणे द्रुतगती मार्ग व जोडरस्ते आणि नवनगरांच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीपोटी अनुज्ञेय लाभ या शासन निर्णयासोबतच्या अनुक्रमे “परिशिष्ट-अ” व “परिशिष्ट-ब” प्रमाणे भूधारकांना प्रती १०,००० चौ.मी. करीता नियोजित नवनगरामध्ये एक (१) अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकासहित विकसित बिनशेती जमीन / भूखंड अनुज्ञेय व देय राहील.

१.३ वरीलप्रमाणे विकसित बिनशेती जमीन / भूखंड भूधारकास पती व पत्नी यांचे संयुक्त नावाने वितरीत करण्यात येतील. यथास्थिती संबंधित भूधारक विधुर / विधवा असल्यास, असा भूखंड विधुर / विधवा भूधारक आणि त्यांची अपत्ये यांचे संयुक्त नावाने वितरीत करण्यात येतील. यथास्थिती असा भूखंड संबंधित भूधारकाच्या कायदेशीर वारसासही वितरित करण्यात येईल.

१.४ वर नमूद केल्यानुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाचा पूर्णतः त्याच भूखंडावर वापर करण्यासाठी लहान क्षेत्राचे भूखंड देय होणाऱ्या भूधारकांनी वाटपापूर्वी इतर भूधारकांसमवेत एकत्रित येऊन विकास योग्य क्षेत्राच्या भूखंडाची मागणी केल्यास त्यानुसार त्यांना एकत्रित भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

१.५ ज्या भूखंडधारकांना एकत्रीकरणाचा लाभ घ्यावयाचा नसेल, अशा भूखंडधारकांना त्यांच्या पात्रतेनुसार भूखंडांचे वाटप करण्यात येईल.

अनुज्ञेय चटई क्षेत्र व जमिनीच्या वापराबाबत तरतूद संबंधित विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अंतर्भूत करण्यात येईल.

१.६ **भूखंड पुनर्खरेदी :**

भूधारकांस जो विकसित बिनशेती भूखंड दिला जाईल, अशा भूखंडास दहा (१०) वर्षानंतर त्याचे योग्य बाजारमूल्य भूधारकांस प्राप्त होत नसेल, तर त्या भूखंडासाठी आताचा भूमिसंपादन अधिनियम, २०१३ प्रमाणे परिगणित भूसंपादनाचा मोबदला जो देय होईल, त्यावर प्रतिवर्ष ९%

दराने सरळव्याज दहा (१०) वर्षासाठी परीगणित करून, त्या रकमेस असा भूखंड शासन/ म.रा.र.वि. महामंडळ/ शासनाने प्राधिकृत केलेले प्राधिकरण पुनर्खरेदी करेल.

२. **वार्षिक अनुदान :-**

२.१ जमिनीच्या प्रतवारीनुसार भूधारकांना प्रती हेक्टरी जमिनीचा ताबा शासनाकडे दिल्यानंतर प्रती वर्षी (दरवर्षी १०% वाढ देऊन) पुढील दहा (१०) वर्षांसाठी अनुज्ञेय वार्षिक अनुदान पुढीलप्रमाणे देय राहील.

| अ.क्र. | प्रती हेक्टरी वार्षिक अनुदान (दरवर्षी १०% वाढ देऊन) (रुपये) | |
|---|---|---|
| | जिरायत क्षेत्र | बागायत क्षेत्र |
| १ | ५०,०००/- | १,००,०००/- |

२.२ शासनाच्या विविध कायद्याखाली धारण / प्रदान / पुनर्प्रदान केलेल्या जमिनीबाबतच्या भूधारणा पद्धती / सत्ता प्रकार कोणताही असला तरी अशा भूधारकांना वरीलप्रमाणे अनुज्ञेय वार्षिक अनुदान देय राहील.

२.३ वरीलप्रमाणे वार्षिक अनुदान भूधारकास पती व पत्नी यांचे संयुक्त नावाने वितरीत करण्यात येतील. यथास्थिती भूधारक विधुर / विधवा असल्यास, असा पिक नुकसान मोबदला विधुर / विधवा भूधारक आणि त्यांची अपत्ये यांचे संयुक्त नावाने वितरीत करण्यात येतील. यथास्थिती असा पिक नुकसान मोबदला संबंधित भूधारकाच्या कायदेशीर वारसासही वितरित करण्यात येईल.

३. **जमीन विकास व त्यावरील बांधकामाचा परतावा :-**

भूधारकांनी त्यांच्या जमिनीमध्ये केलेला विकास जसे फळबागा, विहीर, पाईपलाईन, गुरांचे गोठे, घरे, अन्य बांधकामे, इत्यादी बाबींवरील बांधकामाचा परतावा सक्षम प्राधिकारी यांचे मुल्यांकनानुसार देय राहील.

४. **सहहिस्सेदारांना सामाईक स्वरूपात परतावा :-**

या योजनेंतर्गत प्राप्त करण्यात येणाऱ्या जमिनीच्या अधिकार अभिलेखामध्ये एकापेक्षा जास्त भूधारकांची नावे असल्यास, अशा भूधारकांना उपरोक्त अ.क्र.१ ते ३ मधील भागीदारी / देय व अनुज्ञेय लाभ सामाईक स्वरूपात देण्यात येतील व यथास्थिती उपरोक्त अ.क्र.१ ते ३ मधील बाबी लागू राहतील.

५. **जुन्या बांधकामांची सामग्री नेण्यास अनुमती :-**

भूधारकांना जुन्या बांधकामांची सामग्री विनामुल्य नेण्यास अनुमती राहील.

६. **भूधारकांना व्यावसायिक प्रशिक्षण :-**

प्रकल्पातील भूधारक कुटुंबामधील एक पात्र व्यक्ती शासनाच्या खर्चाने किमान कौशल्य प्राप्त करुन देणारे व्यावसायिक प्रशिक्षण (जसे की, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वेल्डर, फिटर, फ्रीज मेकॅनिक इ. प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण तसेच मुलींकरिता ANM/ JNM दर्जाचे नर्सिंग अभ्यासक्रम) व कौशल्य विकास कार्यक्रमाचा लाभ घेण्यास पात्र राहील व अशा एका पात्र व्यक्तिस शासनाच्या खर्चाने तसा अभ्यासक्रम उत्तीर्ण होण्यास दोन (२) वेळा संधी देण्यात येईल.

७. **इतर लाभ :-**

७.१ नियोजित नवनगरांमध्ये राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत कार्यान्वित योजनांमधून सार्वजनिक सोयी-सुविधा निर्माण करण्यात येतील.

७.२ नियोजित नवनगरांमध्ये कृषी व कृषी पूरक उद्योग, वाणिज्यिक व औद्योगिक गुंतवणूक, शैक्षणिक सुविधा व अनुषंगिक क्षेत्रामध्ये वृद्धी शासन/ खाजगी उद्योगांमार्फत करण्यात येईल.

८. ज्या भूधारकांना वरील पर्याय मान्य नसेल किंवा इतर कोणत्याही कारणास्तव परतावा म्हणून त्यांना विकसित जमीन देता येणे शक्य होत नसेल, अशा भूधारकांना महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ प्रमाणे करारनाम्याद्वारे निश्चित केलेला मोबदला देय राहील. अशा करारनाम्याद्वारे निश्चित करावयाचा मोबदला भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रमाणे परीगणित होणाऱ्या मोबदल्याप्रमाणे निश्चित केला जाईल. असा मोबदला शासन/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणामार्फत देय राहील.

९. **विशेष तरतूद :-**

लॅण्ड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकांसाठी भागीदारी / देय व अनुज्ञेय लाभापैकी विकसित बिनशेती भूखंड शासन/महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणामार्फत वितरीत करण्यात येतील. उर्वरित देय व अनुज्ञेय लाभ यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येईल. अशी तरतूद महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ/ शासनाने प्राधिकृत केलेल्या प्राधिकरणास पुढील वाटपासाठी दरवर्षी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०. **महसूल प्रादेशिक विभाग स्तरीय समिती :-**

१०.१ लॅण्ड पुलिंग योजनेंतर्गत भूधारकांसाठी भागीदारी / देय व अनुज्ञेय लाभ यामध्ये उदभवणाऱ्या अडचणी, भूधारक व यथास्थिती लोकप्रतिनिधी यांच्या सूचना विचारात घेऊन, या धोरणाचे चौकटीत अडी-अडचणींचे निवारण करण्यासाठी महसूल प्रादेशिक विभाग स्तरावर समिती गठीत करण्यात येत आहे. या समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३. | सह व्यवस्थापकीय संचालक-२<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित | सदस्य |
| ४. | सार्वजनिक बांधकाम विभागाने प्राधिकृत केलेला<br>मुख्य अभियंता दर्जाचा अधिकारी | सदस्य |
| ५. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित<br>यांचेकडील प्राधिकृत अधिकारी | सदस्य सचिव |

१०.२ उपरोक्त समितीने आवश्यकतेप्रमाणे या धोरणातील बदलाचा प्रस्ताव उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांना सादर करावा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि.म. मर्यादित यांनी प्राप्त प्रस्तावासंबंधी निर्णय घ्यावा

व या धोरणामध्ये बदल करणे आवश्यक असल्यास, त्याबाबतची कारणे नमूद करून प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी पाठवावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाकडील अनौपचारिक संदर्भ क्र. १४५/व्यय११ दिनांक २४/०६/२०१६, नियोजन विभागाकडील अनौपचारिक संदर्भ क्र. २२३/१४६१ दिनांक २७/०६/२०१६ व विधी व न्याय विभाग, नगर विकास विभाग, महसूल व वन विभाग,कृषि व पदुम विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०७१७३७०४७८१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHISH KUMAR SINGH

Digitally signed by ASHISH KUMAR SINGH
DN: c=IN, o=Personal, postalCode=400020,
st=Maharashtra,
serialNumber=bd08b57d997ae3241e26a495b9e726a9a04aa00e5708c0186163dec9ab4fe335,
cn=ASHISH KUMAR SINGH
Date: 2016.07.07 18:34:37 +05'30'

(आशिष कुमार सिंह)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (कृषि व पदुम विभाग), मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (नगर विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (महसूल व वन विभाग), मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई
१२) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, वांद्रे, मुंबई-५०
१४) विभागीय आयुक्त, कोकण/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर
१५) जिल्हाधिकारी, ठाणे/ नाशिक/ अहमदनगर/ औरंगाबाद/ जालना/ बुलढाणा/ वाशिम/ अमरावती/ वर्धा/ नागपूर.
१६) सर्व मंत्रालयीन विभाग
१७) निवड नस्ती (रस्ते-८), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस २०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८,
दिनांक : ५ जुलै, २०१६ सोबतचे

## परिशिष्ट-अ

### (द्रुतगती मार्ग व जोडरस्ते यांच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीपोटी अनुज्ञेय लाभ)

| अ. क्र. | भूधारणा प्रकार / जमिनीचा प्रकार | | भूधारकांना परत द्यावयाच्या निव्वळ विकास योग्य क्षेत्राचे सूत्र (प्रती १०,००० चौ.मी. करीता) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिरायत जमीन | | बागायत जमीन | |
| | | | टक्केवारी | क्षेत्र (चौ.मी.) | टक्केवारी | क्षेत्र (चौ.मी.) |
| १ | भोगवटादार वर्ग-१ | | २५% | २,५०० | ३०% | ३,००० |
| २ | भोगवटादार वर्ग-२ - कुळ कायद्याप्रमाणे धारण केलेल्या जमिनी | | | | | |
| अ | कुळ कायद्याप्रमाणे कुळांनी जमीन मालक म्हणून धारण केलेल्या जमिनी (नियंत्रित सत्ता प्रकार) | | २५% | २,५०० | ३०% | ३,००० |
| ब | कुळ कायद्याप्रमाणे धारण जमिनीमध्ये कुळ व मालक हितसंबंध प्रस्थापित होत असल्यास. | | | | | |
| | ग्रामीण क्षेत्राकरीता | जमीन मालक : ४०% | १०% | १,००० | १२% | १,२०० |
| | | कुळ : ६०% | १५% | १,५०० | १८% | १,८०० |
| | नगरपालिका क्षेत्राकरीता | जमीन मालक : २५% | ६.२५% | ६२५ | ७.५०% | ७५० |
| | | कुळ : ७५% | १८.७५% | १,८७५ | २२.५०% | २२५० |
| ३ | भोगवटादार वर्ग-२ - विविध सत्ता प्रकार निर्मुलन कायद्याखाली पुनर्प्रदान केलेल्या जमिनी (Land regranted under the various Tenure Abolition Laws) | | १२.५% | १,२५० | १५% | १,५०० |
| ४ | भोगवटादार वर्ग-२ - भूमिधारी यांनी धारण केलेल्या जमिनी | | १२.५% | १,२५० | १५% | १,५०० |
| ५ | भोगवटादार वर्ग-२ - शासनाने नवीन शर्त / नवीन व अविभाज्य सत्ता प्रकार / नियंत्रित सत्ता प्रकार म्हणून प्रदान केलेल्या जमिनी | | १२.५% | १,२५० | १५% | १,५०० |
| ६ | भोगवटादार वर्ग-२ - शासनाने कुळ कायदा / कमाल शेतजमीन धारणा कायद्याखाली प्रदान केलेल्या अतिरिक्त जमिनी | | १२.५% | १,२५० | १५% | १,५०० |
| ७ | वन हक्क कायद्याखाली कसवणूक हक्कासाठी दिलेल्या जमिनी | | १२.५% | १,२५० | १५% | १,५०० |
| ८ | भूदान कायद्याप्रमाणे प्रदान केलेल्या जमिनी | | | | | |
| | भूदान यज्ञ समिती | : ४०% | १०% | १,००० | १२% | १,२०० |
| | जमीन धारक | : ६०% | १५% | १,५०० | १८% | १,८०० |

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक : खाक्षेस २०१६/प्र.क्र.२५१/रस्ते-८,
दिनांक : ५ जुलै, २०१६ सोबतचे

## परिशिष्ट-ब

(नवनगरांच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीपोटी अनुज्ञेय लाभ)

| अ. क्र. | भूधारणा प्रकार / जमिनीचा प्रकार | | | भूधारकांना परत द्यावयाच्या निव्वळ विकास योग्य क्षेत्राचे सूत्र (प्रती १०,००० चौ.मी. करीता) | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | टक्केवारी | क्षेत्र (चौ.मी.) |
| १ | भोगवटादार वर्ग-१ | | | ३०% | ३,००० |
| २ | भोगवटादार वर्ग-२ - कुळ कायद्याप्रमाणे धारण केलेल्या जमिनी | | | | |
| अ | कुळ कायद्याप्रमाणे कुळांनी जमीन मालक म्हणून धारण केलेल्या जमिनी (नियंत्रित सत्ता प्रकार) | | | ३०% | ३,००० |
| ब | कुळ कायद्याप्रमाणे धारण जमिनीमध्ये कुळ व मालक हितसंबंध प्रस्थापित होत असल्यास. | | | | |
| | ग्रामीण क्षेत्राकरीता | जमीन मालक | : ४०% | १२% | १,२०० |
| | | कुळ | : ६०% | १८% | १,८०० |
| | नगरपालिका क्षेत्राकरीता | जमीन मालक | : २५% | ७.५०% | ७५० |
| | | कुळ | : ७५% | २२.५०% | २२५० |
| ३ | भोगवटादार वर्ग-२ - विविध सत्ता प्रकार निर्मुलन कायद्याखाली पुनर्प्रदान केलेल्या जमिनी (Land regranted under the various Tenure Abolition Laws) | | | १५% | १,५०० |
| ४ | भोगवटादार वर्ग-२ - भूमिधारी यांनी धारण केलेल्या जमिनी | | | १५% | १,५०० |
| ५ | भोगवटादार वर्ग-२ - शासनाने नवीन शर्त / नवीन व अविभाज्य सत्ता प्रकार / नियंत्रित सत्ता प्रकार म्हणून प्रदान केलेल्या जमिनी | | | १५% | १,५०० |
| ६ | भोगवटादार वर्ग-२ - शासनाने कुळ कायदा / कमाल शेतजमीन धारणा कायद्याखाली प्रदान केलेल्या अतिरिक्त जमिनी | | | १५% | १,५०० |
| ७ | वन हक्क कायद्याखाली कसवणूक हक्कासाठी दिलेल्या जमिनी | | | १५% | १,५०० |
| ८ | भूदान कायद्याप्रमाणे प्रदान केलेल्या जमिनी | | | | |
| | भूदान यज्ञ समिती | | : ४०% | १२% | १,२०० |
| | जमीन धारक | | : ६०% | १८% | १,८०० |

****